खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – आमदार मा. अमोल मिटकरी व्याख्यान

पुणे जिल्हा
प्रभात पुणे, सोमवार, दि. ३० जानेवारी २०२३ || ३

# आजचा भारत धर्मवादाकडे झुकलेला

## आमदार मिटकरी : शेतकरी, शोषित, वंचित घटकाला मदतीची गरज

**राजगुरूनगर, दि. २९ (प्रतिनिधी) - कालचा भारत विज्ञानवादी होता, आज मात्र धर्म वादाकडे कल झुकला असून उद्याचा भारत सर्वधर्मसमभाव मानणारा असायला हवा. संविधान हा सर्वश्रेष्ठ राष्ट्रग्रंथ असून माणुसकी शिकवणारा धर्म हाच खरा राष्ट्रधर्म आहे. आज तरुणांना जातीभेदावर चर्चेची गरज नसून रोजगारावरील कृती कार्यक्रमाची आवश्यकता आहे. धर्म संकटात नसून अडचणीत आलेल्या शेतकरी, शोषित, वंचित घटकाला मदतीची गरज आहे, असे मत आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केले.**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उज्वल भारताचे कालचे, आजचे व उद्याचे स्वप्न' या विषयावर मिटकरी बोलत होते. याप्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर,जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मला पानसरे, व्याख्यानमाला प्रमुख ॲड. राजमाला बुट्टेपाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अनिल राक्षे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

आमदार मिटकरी म्हणाले की, विशिष्ट वर्गाकडून राजकीय फायद्यासाठी विविध जाती-धर्मात तेढ पसरवण्याचे काम सुरू असून आपल्याला लोकशाही, संविधान वाचवायचे असेल तर धर्म अथवा समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक विज्ञानवादी तरुणांची गरज आहे. भारत हा युवकांचा देश असून ज्या देशातील तरुण जागरूक तो देश कधीही गुलाम बनत नाही. तरुणांनी स्वतःचा रस्ता स्वतः शोधावा. विद्यार्थ्यांनी एक तरी कला स्वतःमध्ये जिवंत ठेवावी. कला तुम्हाला उपाशी मरू देणार नाही. विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरूंचे बलिदान आणि साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेली शैक्षणिक क्रांती न विसलता सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी परिचय डॉ. संजय शिंदे यांनी तर श्रद्धा बालघरे हिने आभार मानले.



राजगुरूनगर : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत उपस्थित महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिक. इन्सेटमध्ये मार्गदर्शन करताना आमदार अमोल मिटकरी.

**छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षकच**

छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षकच होते, तीच त्यांची सर्वसमावेशक प्रतिमा आहे. छत्रपती शाहू महाराज हे आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते असल्याचे सांगून लव्ह जिहाद या शब्दामुळे हिंदू-मुस्लिमांत तेढ निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा आमदार मिटकरी यांनी व्यक्त केली.

प्रभात PuneDistrict, 30 Jan 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

पुण्य नगरी

# प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक तरुणांची गरज : मिटकरी



**शिरोली :** विशिष्ट वर्गाकडून राजकीय फायद्यासाठी विविध जाती-धर्मात दुही पसरवण्याचे काम सुरू असून आपल्याला लोकशाही, संविधान वाचवायचे असेल तर धर्म अथवा समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक विज्ञानवादी तरुणांची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल मिटकरी यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबराव बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत उज्ज्वल भारताचे कालचे, आजचे व उद्याचे स्वप्न या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्था अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अनिल राक्षे, राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के.आर.पाचारणे उपस्थित होते.

कला तुम्हाला उपाशी मरू देणार नाही.विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरूंचे बलिदान आणि साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेली शैक्षणिक क्रांती न विसरता सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन मिटकरी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी तर परिचय डॉ. संजय शिंदे यांनी आणि आभार श्रद्धा बालघरे हिने मानले.

### आमदार अमोल मिटकरी : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

# समाजाला चिकित्सक, विज्ञानवादी तरुणांची गरज

**राजगुरुनगर :** विशिष्ट वर्गाकडून राजकीय फायद्यासाठी विविध जाती-धर्मात दुही पसरवण्याचे काम सुरू असून आपल्याला लोकशाही, संविधान वाचवायचे असेल तर धर्म अथवा समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक विज्ञानवादी तरुणांची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल मिटकरी यांनी केले. ते येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उज्ज्वल भारताचे कालचे, आजचे व उद्याचे स्वप्न' या विषयावर बोलत होते.




याप्रसंगी संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अनिल राक्षे, अॅड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

आमदार मिटकरी पुढे म्हणाले की कालचा भारत विज्ञानवादी होता. आज मात्र धर्मवादाकडे कल झुकला असून उद्याचा भारत सर्वधर्मसमभाव मानणारा असायला हवा. संविधान हे सर्वश्रेष्ठ राष्ट्रग्रंथ असून माणुसकी शिकवणारा धर्म हाच खरा राष्ट्रधर्म आहे. आज तरुणांना जातीभेदावरील चर्चेची गरज नसून, रोजगारावरील कृती कार्यक्रमाची आवश्यकता आहे. आज धर्म संकटात नसून अडचणीत आलेल्या शेतकरी, शोषित, वंचित घटकाला मदतीची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षकच होते, धर्मपंडित होते, तीच त्यांची सर्वसमावेशक प्रतिमा आहे. छत्रपती शाहू महाराज हे आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते असल्याचे सांगून लव्ह जिहाद या शब्दामुळे हिंदू-मुस्लिमांत तेढ निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली.

लोकशाही वाचविण्यासाठी महात्मा गांधी, आंबेडकर, नेहरू ही विचारांची साखळी असून तिचे जतन करण्याचे आवाहन त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज ही महाराष्ट्राची अस्मिता असून त्यांचा संविधानिक पदावरील व्यक्तीने केलेला अनादर खपवून घेणार नाही. भारत हा युवकांचा देश असून ज्या देशातील तरुण जागरूक तो देश कधीही गुलाम बनत नाही. असे सांगताना ते म्हणाले की, तरुणांनी स्वतःचा रस्ता स्वतः शोधावा. विद्यार्थ्यांनी एक तरी कला स्वतःमध्ये जिवंत ठेवावी. कला तुम्हाला उपाशी मरू देणार नाही. विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरूंचे बलिदान आणि साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेली शैक्षणिक क्रांती न विसरता सतत प्रयत्नशील राहण्याचे. आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी, परिचय डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार श्रद्धा बालघरे हिने मानले.

HRC

पुण्य नगरी

# प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक तरुणांची गरज : मिटकरी



**शिरोली :** विशिष्ट वर्गाकडून राजकीय फायद्यासाठी विविध जाती-धर्मात दुही पसरवण्याचे काम सुरू असून आपल्याला लोकशाही, संविधान वाचवायचे असेल तर धर्म अथवा समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक विज्ञानवादी तरुणांची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल मिटकरी यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबराव बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत उज्वल भारताचे कालचे, आजचे व उद्याचे स्वप्न या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्था अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अनिल राक्षे, राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस.पिंगळे, डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के.आर.पाचारणे उपस्थित होते.

कला तुम्हाला उपाशी मरू देणार नाही.विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरूंचे बलिदान आणि साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेली शैक्षणिक क्रांती न विसलता सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन मिटकरी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी तर परिचय डॉ. संजय शिंदे यांनी आणि आभार श्रद्धा बालघरे हिने मानले.

Smart Pimpri Chinchwad Edition
Jan 31, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# समाजाला चिकित्सक, विज्ञानवादी तरुणांची गरज

**राजगुरुनगर (दै. संध्या) :**



विशिष्ट वर्गाकडून राजकीय फायद्यासाठी विविध जाती-धर्मात दुही पसरवण्याचे काम सुरू असून आपल्याला लोकशाही आणि संविधान वाचवायचे असेल तर धर्म अथवा समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक विज्ञानवादी तरुणांची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल मिटकरी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत उज्वल भारताचे कालचे, आजचे व उद्याचे स्वप्न या विषयावर बोलत होते.

याप्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अनिल राक्षे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

अमोल मिटकरी पुढे म्हणाले की कालचा भारत विज्ञानवादी होता, आज मात्र धर्मवादाकडे कल झुकला असून उद्याचा भारत सर्वधर्मसमभाव मानणारा असायला हवा. संविधान हे सर्वश्रेष्ठ राष्ट्रग्रंथ असून माणुसकी शिकवणारा धर्म हाच खरा राष्ट्रधर्म आहे. आज तरूणांना जातीभेदावरील चर्चेची गरज नसून रोजगारावरील कृती कार्यक्रमाची आवश्यकता आहे. आज धर्म संकटात नसून अडचणीत आलेल्या शेतकरी, शोषित, वंचित घटकाला मदतीची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षकच होते, धर्मपंडित होते, तीच त्यांची सर्वसमावेशक प्रतिमा आहे. छत्रपती शाहू महाराज हे आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते असल्याचे सांगून लव्ह जिहाद या शब्दामुळे हिंदू-मुस्लिमांत तेढ निर्माण होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली.

लोकशाही वाचविण्यासाठी महात्मा गांधी, आंबेडकर, नेहरू ही विचारांची साखळी असून तिचे जतन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज ही महाराष्ट्राची अस्मिता असून त्यांचा संविधानिक पदावरील व्यक्तीने केलेला अनादर खपवून घेणार नाही. भारत हा युवकांचा देश असून ज्या देशातील तरुण जागरूक तो देश कधीही गुलाम बनत नाही. असे सांगताना ते म्हणाले की तरुणांनी स्वत:चा रस्ता स्वत: शोधावा. विद्यार्थ्यांनी एक तरी कला स्वत:मध्ये जिवंत ठेवावी. कला तुम्हाला उपाशी मरू देणार नाही. विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरूंचे बलिदान आणि साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेली शैक्षणिक क्रांती न विसरता सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी परिचय डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार श्रद्धा बालघरे या विद्यार्थिनीने मानले.

HRM

## आमदार अमोल मिटकरी : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

# समाजाला चिकित्सक, विज्ञानवादी तरुणांची गरज

**राजगुरुनगर :** विशिष्ट वर्गाकडून राजकीय फायद्यासाठी विविध जाती-धर्मात दुही पसरवण्याचे काम सुरू असून आपल्याला लोकशाही, संविधान वाचवायचे असेल तर धर्म अथवा समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक विज्ञानवादी तरुणांची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल मिटकरी यांनी केले. ते येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'उज्ज्वल भारताचे कालचे, आजचे व उद्याचे स्वप्न' या विषयावर बोलत होते.




याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अनिल राक्षे, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.


आमदार मिटकरी पुढे म्हणाले की कालचा भारत विज्ञानवादी होता. आज मात्र धर्मवादाकडे कल झुकला असून उद्याचा भारत सर्वधर्मसमभाव मानणारा असायला हवा. संविधान हे सर्वश्रेष्ठ राष्ट्रग्रंथ असून माणुसकी शिकवणारा धर्म हाच खरा राष्ट्रधर्म आहे. आज तरूणांना जातीभेदावरील चर्चेची गरज नसून, रोजगारावरील कृती कार्यक्रमाची आवश्यकता आहे. आज धर्म संकटात नसून अडचणीत आलेल्या शेतकरी, शोषित, वंचित घटकाला मदतीची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षकच होते, धर्मपंडित होते, तीच त्यांची सर्वसमावेशक प्रतिमा आहे. छत्रपती शाहू महाराज हे आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते असल्याचे सांगून लव्ह जिहाद या शब्दामुळे हिंदू-मुस्लिमांत तेढ निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली.

लोकशाही वाचविण्यासाठी महात्मा गांधी, आंबेडकर, नेहरू ही विचारांची साखळी असून तिचे जतन करण्याचे आवाहन त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज ही महाराष्ट्राची अस्मिता असून त्यांचा संविधानिक पदावरील व्यक्तीने केलेला अनादर खपवून घेणार नाही. भारत हा युवकांचा देश असून ज्या देशातील तरुण जागरूक तो देश कधीही गुलाम बनत नाही. असे सांगताना ते म्हणाले की, तरुणांनी स्वतःचा रस्ता स्वतः शोधावा. विद्यार्थ्यांनी एक तरी कला स्वतःमध्ये जिवंत ठेवावी. कला तुम्हाला उपाशी मरू देणार नाही. विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरूंचे बलिदान आणि साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेली शैक्षणिक क्रांती न विसरता सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी, परिचय डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार श्रद्धा बालघरे हिने मानले.

HK



पुणे, २ फेब्रुवारी २०२३

@kesarinewspaper

७

# समाजाला चिकित्सक, विज्ञानवादी तरुणांची गरज : अमोल मिटकरी

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** विशिष्ट वर्गाकडून राजकीय फायद्यासाठी विविध जाती-धर्मात दुही पसरवण्याचे काम सुरू असून आपल्याला लोकशाही आणि संविधान वाचवायचे असेल तर धर्म अथवा समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणाऱ्या चिकित्सक विज्ञानवादी तरुणांची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल मिटकरी यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत उज्वल भारताचे कालचे, आजचे व उद्याचे स्वप्न या विषयावर बोलत होते.




यावेळी संस्था अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अनिल राक्षे, ड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

अमोल मिटकरी पुढे म्हणाले की, कालचा भारत विज्ञानवादी होता, आज मात्र धर्मवादाकडे कल झुकला असून उद्याचा भारत सर्वधर्मसमभाव मानणारा असायला हवा. संविधान हे सर्वश्रेष्ठ राष्ट्रग्रंथ असून माणुसकी शिकवणारा धर्म हाच खरा राष्ट्रधर्म आहे. आज तरूणांना जातीभेदावरील चर्चेची गरज नसून रोजगारावरील कृती कार्यक्रमाची आवश्यकता आहे. आज धर्म संकटात नसून अडचणीत आलेल्या शेतकरी, शोषित, वंचित घटकाला मदतीची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यरक्षकच होते, धर्मपंडित होते, तीच त्यांची सर्वसमावेशक प्रतिमा आहे. छत्रपती शाहू महाराज हे आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते असल्याचे सांगून लव्ह जिहाद या शब्दामुळे हिंदू-मुस्लिमांत तेढ निर्माण होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली. लोकशाही वाचविण्यासाठी महात्मा गांधी, आंबेडकर, नेहरू ही विचारांची साखळी असून तिचे जतन करण्याचे आवाहन त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज ही महाराष्ट्राची अस्मिता असून त्यांचा संविधानिक पदावरील व्यक्तीने केलेला अनादर खपवून घेणार नाही. भारत हा युवकांचा देश असून ज्या देशातील तरुण जागरूक तो देश कधीही गुलाम बनत नाही. असे सांगताना ते म्हणाले की तरुणांनी स्वतःचा रस्ता स्वतः शोधावा. विद्यार्थ्यांनी एक तरी कला स्वतःमध्ये जिवंत ठेवावी. कला तुम्हाला उपाशी मरू देणार नाही. विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरूंचे बलिदान आणि साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेली शैक्षणिक क्रांती न विसरता सतत प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. आभार श्रद्धा बालघरे या विद्यार्थिनीने मानले. ₹

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**